# प्रेसनोट दि.०१/०२/२०२३

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडील वाहतुक शाखेमार्फत दिनांक २०/०१/२०२३ ते ३१/१/२०२३ दरम्यान राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात चाकण, भोसरी, तळेगाव हि औद्योगिक क्षेत्रे तसेच हिंजवडी, तळवडे, चिखली ही आयटी पार्क क्षेत्रे आहेत. सदर क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या नागरीकांची संख्याही मोठी असुन त्यांचेमार्फत दुचाकी व चारचाकी वाहनांचा वापर हा मोठ्या प्रमाणात होत आहे. नागरीकांकडुन वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणात होत असुन सदर उल्लंघनामुळे अपघातांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होवुन गंभिर व किरकोळ स्वरुपाचे अपघात होत आहेत. सदर अपघातामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत तसेच वित्तहानी होत असल्याने त्यास प्रतिबंध करण्याकरीता पिंपरी चिंचवड वाहतुक शाखा कटीबध्द आहे.

मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांचे आदेशाने सह पोलीस आयुक्त मनोज लोहिया सा़ो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री संजय शिंदे सो तसेच पोलीस उपायुक्त काकासाहेब डोळे सो, विवेक पाटील सो. यांचे मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत पिंपरी चिंचवड वाहतुक विभागामार्फत दिनांक २०/०१/२०२३ ते ३१/१/२०२३ दरम्यान रॉंग साईड, नो इंट्री तसेच बिआरटीच्या मार्गिकेमधुन जाणाऱ्या वाहनांविरुद्ध विशेष मोहिम राबविण्यात आली होती.

सदर मोहिमेदरम्यान रॉंग साईडच्या एकुण १०९२ वाहनांवर खटले भरण्यात आले असुन नो इंट्रीच्या (प्रवेश बंद) एकुण ३१३८ केसेस करुन २२५५२५०/- रुपये दंड, तसेच बीआरटी मार्गिकेमधुन जाणाऱ्या वाहनांवर एकुण २४५० केसेस करुन १४०६२००/- रुपये दंड आकारण्यात आला असुन अशाप्रकारे एकुण १०९२ वाहनचालकांवर मा. न्यायालयात खटले दाखल करण्यात असुन नो इंट्रीच्या/बीआरटी मार्गिकेमधुन प्रवास करणाऱ्या वाहनांवर एकुण ५५८८ केसेस करुन एकुण ३६६१४५०/- एवढा दंड आकारण्यात आला आहे. यापुढे अशाच प्रकारच्या वेगवेगळ्या हेडखाली वाहतुक विभागामार्फत कारवाई करण्यात येणार असल्याने नागरीकांनी वाहतुक नियमांचे पालन करुन पिंपरी चिंचवड पोलीसांना सहकार्य करावे असे अवाहन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामार्फत करण्यात येत आहे.

(सतिश माने)
सहा.पोलीस आयुक्त,
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड शहर

Scanned with CamScanner